नि.फौ.ख.क्र.६९/२०२०
शासन विरुध्द उमेश
नि.क्र.४० पुढे सुरु

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु.**

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती जाधव** -

४. (यावेळी नि.क्र.४३ वरील आदेशानुसार नि.क्र.४२ वरील पत्रासह दाखल असलेला लखोटा खुल्या न्यायालयात फिर्यादी, आरोपी व त्यांचे विधिज्ञ श्री आर.एच.भोसले यांच्यासमक्ष उघडण्यात आला. )

५. आता मला त्या लखोटयातील मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक सीआयडी ऑफीस पुणे यांचे दि.०९.०२.२०२४ रोजीचे मुळ पत्र दाखविण्यात आले. ते **नि.क्र.४६** वर आहे. त्या पत्रासह असलेला मुळ लखोटयातील बंद लखोटा मला आता दाखविण्यात आला. त्यावर इंग्रजीमध्ये 'OPINION' असे स्टॅम्पने उमटविण्यात आले आहे. तसेच त्यावर इंग्रजीत त्याखाली "HW-614/2019" असे पेनाने नमुद असुन श्री एस.ए.आत्राम यांची सही व शिक्का आहे. आता मला त्या लखोटयातील दि वाई अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि. वाई शाखा सोनगिरवाडी येथील माझे रिकरिंग ठेव खाते क्र.१३९५ चे मुळ पासबुक दाखविण्यात आले. ते तेच आहे. आता मला त्या लखोटयातील बँक ऑफ महाराष्ट्र सन २०१८ ची मुळ डायरी दाखविण्यात आली. ती

तीच आहे. ती डायरी व पासबुक मी पोलीस स्टेशन वाई येथे दिले होते. (यावेळी साक्षीदाराने अभिलेखाचे अवलोकन केले.) आता मला सदरील लखोटयातील आरोपीचे हस्ताक्षर नमुने असलेले एकुण सहा मुळ कागद दाखविण्यात आले. मुळ लखोटा **नि.क्र. ४७** वर आहे.

**६.** यावेळी मला मुळ लखोटा नि.क्र.४७ मधील बंद लखोटा ज्यावर इंग्रजीमध्ये 'OPINION' असे स्टॅम्पने उमटविण्यात आले आहे व त्यावर इंग्रजीत त्याखाली "HW-614/2019" असे पेनाने नमुद केले आहे तो दाखविण्यात आला. सदरील बंद लखोटा **नि.क्र.४८** वर असुन त्यावर श्री एस.ए.आत्राम यांची सही व शिक्का आहे. (तो नि.क्र.४८ वरील बंद लखोटा फिर्यादी, आरोपी व त्यांचे विधिज्ञ श्री आर.एच.भोसले यांच्यासमक्ष उघडण्यात आला.) आता मला त्यात असलेला मुळ अभिप्राय दि.०९.०२.२०२४ दाखविण्यात आला. त्यावर सहाय्यक शासकीय दस्तऐवज परीक्षक शीतल ए. आत्राम यांची सही आहे. सदरील मुळ अहवालास ओळखीपुरती **नि.क्र.४९** देण्यात येते.

***सहाय्यक सरकारी अभियोक्त यांच्या विनंतीवरुन पुढील सरतपास तहकुब.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरी/-
(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२, वाई.

दि.०५.०८.२०२४